# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,मुंबई

जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर
४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे(पूर्व) ,मुंबई ५१.
फोन नं.२६४७ ४८१२ टेलीफॅक्स नं.२६४७ १६११
ई-मेल- jtdirrom@gmail.com संकेतस्थळ - www.jdteromumbai.com


क्र.४/विकामुं/तंशि/तांत्रिक-४/२०१६/१३८०
दिनांक : १९/६/२०१७

प्रति,
प्राचार्य,
मुंबई विभागातील सोबतच्या यादीमध्ये नमूद
विनाअनुदानीत पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था.

विषय – शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये पदमभूषण वसंतदादा पाटील प्रतिष्ठांनचे अभियांत्रिकी महाविद्यालय, सायन, मुंबई या संस्थेतून इतर संस्थेत स्थलांतरीत झालेल्या विद्यार्थ्यांबाबत.

संदर्भ – मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्र क्र. २/एनजीसी/वि.स.व/२०१७/६८२ दि.१३.०६.२०१७

उपरोक्त विषया संदर्भात आपणांस कळविण्यात येते की, पदमभूषण वसंतदादा पाटील प्रतिष्ठांनचे अभियांत्रिकी महाविद्यालय, सायन, मुंबई या महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये प्रथम वर्ष व थेट व्दित्तीय वर्षात प्रवेश घेतलेल्या एकूण ४३८ विद्यार्थ्यांचे अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्या आदेशानुसार गत शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये या विभागातील इतर महाविद्यालयात स्थलांतरीत करण्यात आले होते. सदर स्थलांतरीत केलेले विद्यार्थी हे महाविद्यालयाच्या मंजूर प्रवेश क्षमतेपेक्षा अधिक संख्या असतानाही अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने दिलेल्या मान्यतेनुसार विद्यार्थ्यांच्या स्थलांतरणाबाबतची कार्यवाही करण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने आपल्या संस्थेतसुध्दा सदर महाविद्यालयातील कांही विद्यार्थ्यांचे स्थलांतरण करण्यात आलेले आहे.

आता पदमभूषण वसंतदादा पाटील प्रतिष्ठांनचे अभियांत्रिकी महाविद्यालय, सायन, मुंबई या महाविद्यालयाला अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करीता Extension of Approval दिलेले आहे. सदर Extension of Approval च्या आधारे गत शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये इतर महाविद्यालयामध्ये स्थलांतरीत केलेल्या संपूर्ण विद्यार्थ्यांना पुन्हा संस्थेत परत पाठविण्याबाबत पदमभूषण वसंतदादा पाटील प्रतिष्ठांनचे अभियांत्रिकी महाविद्यालय, सायन, मुंबई या महाविद्यालयाने केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी खालीलप्रमाणे कळविलेले आहे.

" The Students may be pemitted to shift back to Padmabhushan Vasantdada Patil Pratishthan's College of Engineering "

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी दिलेल्या निर्देशास अनुसरुन संचालनालयाच्या वरील संदर्भिय पत्रान्वये मागील वर्षी ज्या संस्थेत विद्यार्थी स्थलांतरीत करण्यात आलेले होते त्या संस्थेच्या प्राचार्यांच्या ना हरकत प्रमाणपत्रासह ( No Objection Certificate ) सदर स्थलांतरीत विद्यार्थ्यांना पदमभूषण वसंतदादा पाटील प्रतिष्ठांनचे अभियांत्रिकी महाविद्यालय, सायन, मुंबई येथे स्थलांतराने शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये प्रवेश घेण्यास मान्यता प्रदान करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

संचालनालयाच्या वरील निर्देशानुसार आपणांस सूचित करण्यात येते की, आपल्या संस्थेमध्ये शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये पदमभूषण वसंतदादा पाटील प्रतिष्ठांनचे अभियांत्रिकी महाविद्यालय, सायन, मुंबई या संस्थेतील स्थलांतराने प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांच्या नावासह व आपल्या ना हरकत प्रमाणपत्रासह प्रस्ताव दि. २३/६/२०१७ पूर्वी विद्यार्थ्यांच्या स्थलांतराच्या अनुषंगाने या कार्यालयास सादर करावा. पुढील शैक्षणिक वर्ष लवकरच सुरु होणार असल्याने व सदर प्रश्न हा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्याच्या दृष्टीने महत्वाचा असल्याने याबाबत आपल्या स्तरावर तात्काळ कार्यवाही करुन वरीलप्रमाणे माहिती सादर करावी.

(प्रमोद अ.नाईक)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई.

प्रत:- मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय म.रा.मुंबई यांना माहिती करीता सादर